# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## प्रसिध्दीपत्रक

**(जाहिरात क्र. ०५/२०२३, जाहिरात क्र. ०६/२०२३, जाहिरात क्र. ०७/२०२३ व जाहिरात क्र. ०८/२०२३ )**

------

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सरळसेवा भरती अंतर्गत खालील नमूद पदे भरण्यासाठी दि. २९/१२/२०२३ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच याबाबत विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

| अनु.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नांव |
|---|---|---|
| १ | ०५/२०२३ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) |
| २ | ०६/२०२३ | विद्युत सहाय्यक |
| ३ | ०७/२०२३ | पदवीधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |
| ४ | ०८/२०२३ | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |

२. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम-२०२४ दि. २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदावरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि.२७.०२.२०२४ अनुसार प्रस्तुत संवर्गाच्या विज्ञापीत जाहिरातीकरीता लागू आहेत.

३. उक्त जाहिरातीकरीता सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरीता आरक्षण निश्चित करुन सुधारीत रिक्त पदांचा तपशील दि. २१.०६.२०२४ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातून (EWS) अर्ज केलेल्या उमेदवारांनी एसईबीसी प्रवर्गाचा विकल्प सादर करणे व इतर मार्गदर्शक सूचनाही प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.

४. **सबब, ज्या एसईबीसी उमेदवारांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) व खुल्या प्रवर्गातून अर्ज भरले आहेत त्यांचेसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (SEBC) प्रवर्गाचा विकल्प सादर करणेबाबची वेबलिंक (URL Link) कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. सदर उमेदवारांनी दि. १७.०७.२०२४ पर्यंत विकल्प सादर करावेत.** तसेच याद्वारे कळविण्यात येते की, वयाधिकामुळे जे एसईबीसी उमेदवार अर्ज करु शकले नाहीत त्यांचेकरीताही लवकरच स्वतंत्र वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सही/-**

**दिनांक : ०३/०७/२०२४**

**सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं)**